नि.फौ.ख.क्र. ३७/२०१५
सरकार वि. रुपाली
निशाणी ८२

दिनांक १३/१०/२०२५

साक्षीदार क्र.११ यांचा उलटतपास आरोपीतर्फे – श्री.पी.डी.जेडगे विद्यमान वकील यांच्यामार्फत शपथेवर सुरु

०८. हे म्हणणे खरे आहे की मी आरोपींना वैयक्तिकरित्या ओळखण्याचे काही कारण नाही. माझा जबाब पोलिसांनी सांगली येथील सिव्हील हॉस्पीटल येथे नोंदविला होता. हे म्हणणे खरे आहे की जबाब नोंदवितेवेळी या प्रकरणामधील गुन्हा क्रमांक, कायद्याची कलमे, आरोपींची नावे हे मला माहिती नव्हते. हे म्हणणे खरे आहे की तथाकथित अर्भक कोणत्या परिस्थितीत जन्माला आले याची मला वैयक्तिक माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की त्याअनुषंगाने माझ्या जबाबात नमूद केलेली माहिती माझी ऐकीव माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की आरोपीचे नाव रुपाली वाघमारे आणि धनाजी गळवे आहे आणि त्यांना मी ओळखते असे पोलिसांना सांगितले नव्हते. पोलिसांनी त्यांची नावे का नमूद केले याचे कारण मला सांगता येणार नाही.

०९. मी पोलिसांना बयाण देताना असे सांगितले नव्हते की, ''आरोपी क्र.१ व २ यांचे पाच दिवसांचे अपत्य त्यांनी जमिनीत पुरले होते'', ''त्या अर्भकाचे बाल कल्याण समितीच्या आदेशान्वये डी.एन.ए टेस्ट करण्याकरिता मी स्वतः अर्भकाला घेवून गेले होते''. त्यानंतर आरोपी क्र.१ व २ यांना बालकल्याण समिती समोर हजर केले, आरोपी क्र.१ व २ यांनी अनैतिक संबंधातून मूल झाले असल्यामुळे त्यागपत्र भारतीय समाजसेवा केंद्र, माधवनगर यांना करुन दिले''. हे म्हणणे खरे आहे की मी सरतपासात या बाबी पहिल्यांदाच न्यायालयासमोर सांगितल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की मी न्यायालयासमक्ष पहिल्यांदा सांगितलेल्या सर्व बाबी पोलिसांनी सांगितल्यामुळे खोट्या

नमूद केल्या आहेत.

**१०.** मी पोलिसांना बयाण देताना असे सांगितले होते की,''पोलिसांनी ते जिवंत अर्भक सिव्हील हॉस्पीटल सांगली येथे दाखल केले''. ''ते अर्भक आमच्या समाजसेवा केंद्रामध्ये आल्यानंतर त्याची आणि आरोपी क्र.१ व २ यांची पोलिसांनी डी.एन.ए टेस्ट करुन घेतल्या''. सदर बाबी माझ्या बयाणात नमूद नसण्याचे कारण मला सांगता येणार नाही.

**११.** हे म्हणणे खरे आहे की तथाकथित अर्भकाचा जन्म आरोपी क्र.१ व२ यांच्या अनैतिक संबंधातून झाला किंवा नाही याची मला वैयक्तिक माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की मी सरतपासात नमूद केलेले दोन्ही त्यागपत्र या प्रकरणात दाखल केलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की आरोपी क्र.१ व २ यांनी त्यागपत्र लिहून दिले आणि ती आम्ही न्यायालयात दाखल केली आहेत असे खोटे सांगत आहे. माझ्या माहितीप्रमाणे पोलिसांनी जबाब निश्चित किती तारखेला नोंदविला होता ती तारीख मला आता आठवत नाही. साक्षीदार सांगतात की, घटनेला अकरा वर्ष होवून गेली आहेत त्यामुळे जबाबाची तारीख सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की पोलिसांनी माझा कधीही जबाब नोंदविला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला व्यक्तीशः डी.एन.ए टेस्ट आणि त्याच्या प्रक्रियेची माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की डी.एन.ए चा नमुना कसा घेतला जातो, ते किती दिवसांपर्यंत ठेवले जाते याबाबत मला व्यक्तीशः माहिती नाही.

**१२.** हे म्हणणे खरे नाही की मी सरतपासात नमूद केलेला मजकूर पोलिसांनी मला सांगितल्यामुळे नमूद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की पोलिसांनी मला जे काही सुचविले त्याप्रमाणे मी खोटा जबाब न्यायालयासमक्ष दिला आहे. हे म्हणणे खरे नाही की

**नि.फौ.ख.क्र. ३७/२०१५**
**सरकार वि. रुपाली**
**निशाणी ८२**

मी आरोपी क्र.१ व २ यांना मागील तारखेस पहिल्यांदाच न्यायालयात पाहिलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की मी सरतपासात नमूद केलेला संपूर्ण पत्रव्यवहारासंदर्भातील मजकूर हा पोलिसांच्या सांगण्यावरुन खोटा सांगितला आहे.

**१३.** हे म्हणणे खरे नाही की माझ्या सरतपासातील परिच्छेद क्र.१ ते ६ मधील नमूद केलेला संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की केवळ पोलिसांच्या सांगण्यावरुन मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्विकृती,

समक्ष,

RAHUL BHALCHANDRA KULKARNI

Digitally signed by RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Date: 2025.10.13 12:44:58 +0530

दि.१३/१०/२०२५
आटपाडी.

( आर. बी. कुलकर्णी )
सह न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
आटपाडी